schools under Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, as well as granting permission for upgrading existing schools, for the academic year 2014-15...

## Government of Maharashtra

School Education and Sports Department
Government Resolution No: SFS-2013/Pr. No. 80/S.D.-2
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai-400032
Date: 26 February 2014

Reference:

1. Government Resolution, School Education and Sports Department, No. NASHI-2009/(663/09)/Mashi-1, dated 20 June 2012.
2. Letter from Education Director (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune, Letter No. Amasha/Self finance/2013/60454/15-K(5)/12019, dated 24 December 2013.

**Introduction:**

Under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, proposals for starting new schools, as well as for obtaining academic permission for additional divisions in existing schools, are received. To provide timely approvals for new schools and divisions, the said Act was enacted in 2012.

However, due to non-availability of approval for proposals after 2012, CBSE, ICSE, IGCSE, IB, and other similar boards' schools face operational difficulties. Considering this, the government decided to take up approval work for the academic year 2014-15 and a detailed circular was issued on 20 June 2012.

For the academic year 2014-15, the government has decided to accept proposals for new self-financed schools till 31 August 2013 for scrutiny and action.

**Government Decision:**

Under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (Act No. 1 of 2013), the government has received a total of 3100 proposals for new schools and division approvals for the academic year 2014-15, which are categorized as follows:

| Sr. No. | Category | Eligible Proposals | Ineligible Proposals | Total Proposals |
|---|---|---|---|---|
| 1 | Proposals for new schools | 1804 | 1325 | 3129 |
| 2 | Proposals for divisions in existing schools | 413 | 158 | 571 |
| | Total Proposals | 2217 | 1483 | 3700 |

NOTARY
CHANDRASHEKHAR VISHWANATH SAKHARE
Nagpur
M.S India
R.No.29880
My Term Expires on 01-01-2030
GOVT. OF INDIA

Scanned with OKEN Scanner

1.1

Approval is hereby granted for eligible proposals for establishing new schools and division approvals for the academic year 2014-15 as per Annexure-A.

1.2

Ineligible Proposals - Proposals for new school establishments and division approvals, deemed ineligible, will be rejected after scrutiny by the district-level scrutiny committees and relevant institutes, following proper legal procedures.

2. Terms and Conditions for Granting Permissions:

2.1 Primary and Upper Primary Schools must comply with the provisions of the Right to Free and Compulsory Education Act, 2009.

2.2 The institutions whose proposals are eligible must start their schools in the academic year 2014-15 after obtaining permissions accordingly.

2.3 Eligible institutions must apply for recognition (approval) as per the respective acts and must commence operations within one month of receiving approval.

2.4 For Secondary and Higher Secondary Schools, prior recognition (NOC) from the Education Director (Secondary) and following the government's stipulated process is mandatory.

2.5 Institutions must display the list of permitted new schools and divisions on their notice boards.

2.6 Institutions granted permission cannot change the location of the approved school. If the institution wishes to change the location, the given permission will be considered void.

2.7 Institutions must enter the permitted school/division information in the District U-DISE (Unified District Information System for Education) database.

The District Project Officer, Maharashtra Primary Education Council, Mumbai, will coordinate the necessary actions. Institutions must label their schools accordingly:

"Self-Financed Schools Permitted under Self-Financed School Act" for new schools.

"Self-Financed School Division Permitted under Self-Financed School Act" for division approvals.

This order is available on the Maharashtra Government website: www.maharashtra.gov.in.

**Signed by:**

**Ramchandra Ganpat Gunjal**

Under Secretary, Government of Maharashtra

**Distribution List:**

1. Commissioner, School Education, Maharashtra State, Pune
2. Commissioners of all Municipal Corporations
3. Chief Executive Officers of all Zilla Parishads
4. Director, Information & Public Relations, Mantralaya, Mumbai

Scanned with OKEN Scanner

5. State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai

6. Director of Education (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune

7. Director of Education (Primary), Maharashtra State, Pune

8. Heads of all Departments

9. Deputy Secretaries of all Departments

10. Education Officers of all Zilla Parishads (Primary/Secondary)

11. All Education Inspectors (East / West / South Mumbai)

**For Information Copy:**

1. Hon. Minister (School Education) Private Secretary

2. Hon. State Minister (School Education) Private Secretary

3. Principal Secretary (School Education) Personal Assistant

4. All Joint Secretaries/Deputy Secretaries, School Education and Sports Department

5. Record Copy (SFS-2)

| Government Decision No. SFS-1114/Pra.No. 40/SM-2, dated 26th February 2014, Cover letter | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | District | Name and address of the institution | Name and location of the proposed school | New school/ upgrade | Type | Medium | The final decision of the Government will be taken after considering the recommendation of the Scrutiny Committee and the objections / suggestions / objections received in this regard. |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 775 | Nagpur | Hajrat Baba Lodhishah Bahuddesiya Sikshan Sanstha, Butibori Nagpur | Late Puranlal Agrawal CBSE School, Turakmari, Tah. Hingna, Dist. Nagpur | New School | Primary | English | Eligible |

NOTARY
CHANDRASHEKHAR VISHWANATH SAKHARE
Nagpur
M.S. India
R.No.29880
My Term Expires on 01-01-2030
GOVT. OF INDIA

TRUE COPY
05/08/2025
CHANDRASHEKHAR VISHWANATH SAKHARE
ADVOCATE & NOTARY
NAGPUR. (M.S.)
REG. NO. 29880

NOTARY
Chandrashekhar V. Sakhare
NAGPUR
(M.S.) India
Regn. No.
29880
My Term Expires on 01-01-2030
GOVT. OF INDIA

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएन- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अगाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

अध्यक्ष
हजरत बाबा लोधीशाह
बहुउद्देशीय शिक्षण संस्था
मु. पो. बुटीबोरी, जि. नागपूर.

Scanned with OKEN Scanner

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| एकूण | | २२१७ | १४८३ | ३७०० |

१.१ **नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** - या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देत आहे.

१.२.**अपात्र शाळा-** नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

२. **शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

अध्यक्ष
हजरत बाबा लोधीशाँह
बहुउद्देशीय शिक्षण संस्था
मु. पो. बुटीबोरी, जि. नागपूर.



Scanned with OKEN Scanner

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

अध्यक्ष
हजरत बाबा लोधीशॉह
बहुउद्देशीय शिक्षण संस्था
मु. पो. बुटीबोरी, जि. नागपूर.



Scanned with OKEN Scanner

"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

अध्यक्ष
हजरत बाबा लोधीशाह
बहुउद्देशीय शिक्षण संस्था
मु. पो. बुटीबोरी, जि. नागपूर.



Scanned with OKEN Scanner

१२.संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

५. निवडनस्ती (एसएम २).

अध्यक्ष
हजरत बाबा लोधीशाह
बहुउद्देशीय शिक्षण संस्था
मु. पो. बुटीबोरी, जि. नागपूर



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेऊन शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 766 | उस्मानाबाद | आहिल्या बहुउदेशिय सामाजिक संस्था, तेर ता.जि.उस्मानाबाद | कै.पवनराजे निंबाळकर इंग्रजी प्राथमिक शाळा गोवर्धनवाडी ता.जि.उस्मानाबाद | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 767 | उस्मानाबाद | आहिल्या बहुउदेशिय सामाजिक संस्था, तेर ता.जि.उस्मानाबाद | कै.पवनराजे निंबाळकर मराठी प्राथमिक शाळा गोवर्धनवाडी ता.जि.उस्मानाबाद | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 768 | उस्मानाबाद | विद्यालंकारभूषण स्वामी विवेकानंद सोसायटी पुणे | लिटल वंडर्स इंटरनॅशनल स्कूल, वालवड ता.भूम जि.उस्मानाबाद | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 769 | उस्मानाबाद | शकुंतला देवी सामाजिक व बहुउदेशिय मंडळ, गोवर्धनवाडी ता.जि.उस्मानाबाद | स्वराज प्राथमिक विद्यालय, जागजी ता.जि.उस्मानाबाद | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 770 | उस्मानाबाद | मदरसा दावतुल उलूम बहुउदेशिय सामाजिक संस्था, नळदुर्ग ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद | सराह प्राथमिक शाळा,वैराग रोड, उस्मानाबाद | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 771 | उस्मानाबाद | श्री.ऐश्वर्यलक्ष्मी शैक्षणिक बहुउदेशिय सामाजिक संस्था ,उमरगा ता.उमरगा | डॉ.एच.बी.के.इंग्लिश स्कूल एकोंडी (ज) ता.उमरगा | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 772 | नागपूर | रवि बहुउदेशिय शिक्षण व क्रिडा मंडळ, पारशिवनी जि. नागपूर | रामा वसाहत मराठी प्राथमिक शाळा, रामा कॉलोनी, नागपूर ग्रामिण जि. नागपूर | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 773 | नागपूर | पिपल्स वेलफकअर सोसा. पी.डब्लू.एस. कॉलेज, कामठी रोड, नागपूर | नागपूर पब्लिक स्कूल, पी.डब्लू.एस. कॉलेज परिसर, टेका नाका, नागपूर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 774 | नागपूर | भारतीय विद्या प्रसारक संस्था, अभ्यंकर नगर, नागपूर | नूतन भारत इंग्लिश स्कूल, अभयंकर नगर,नागपूर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 775 | नागपूर | हजरत बाबा लोधीशाह बहुउदेशिय शिक्षण संस्था, बुटीबोरी,नागपूर | स्व.पुरणलाल अग्रवाल स्कूल, सी.बी.एस.ई. इंग्लिश स्कूल, तुरकमारी ता. हिंगणा जि. नागपूर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 776 | नागपूर | स्व.रेवनाथ चौरे मेमोरीयल ट्रस्ट, कर्नलबाग, नागपूर | रेवनाथ चौरे पब्लिक स्कूल सावनेर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 777 | नागपूर | समता बहुउदेशिय संस्था, अमरावती | जी.डी.एस. स्कूल, गणेश नगर, नागपूर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

अध्यक्ष
हजरत बाबा लोधीशाह
बहुउद्देशीय शिक्षण संस्था
मु. पो. बुटीबोरी, जि. नागपूर.



Scanned with OKEN Scanner

**Government of Maharashtra**
School Education and Sports Department
Mantralaya (Extension), Room No. 432,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-32.
Email ID: sm2.sesd-mh@gov.in

Reference No.: SFS-1021/Pra. No. 562/SM-2 Date: 24 July 2023

## Permission Letter

To,
The Chairman/Secretary,
Hajrat Baba Lodhishah Bahuddesiya Shikshan Sanstha,
Butibori, Nagpur.

Subject: Regarding granting permission for starting a new self-financed branch/class under Maharashtra Self-financed School (Establishment and Regulation) Act, 2012 to Hajrat Baba Lodhishah Bahuddesiya Shikshan Sanstha, Butibori, Nagpur.

Reference: Irada Letter Number SFS-1021/ Pra. No. 562/SM-2 , Date 03.09.2021

Under the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012, **Hajrat Baba Lodhishah Bahuddesiya Shikshan Sanstha, Butibori, Nagpur** had submitted an application for upgrading the status of **Late Puranlal Agarwal CBSE School, Khasara No. 75/3, Village Turkamari, Tal. Hingna, Dist. Nagpur (Upper Primary to Higher Secondary by connecting it to Primary School, Class 6 to 12, All Branches, English Medium, CBSE)** on a self-aided basis from the academic year 2023-24. Application step school.

2. In connection with your application, a letter of intent was given with terms and conditions for upgrading the status of **Hajrat Baba Lodhishah Bahuddesiya Shikshan Sanstha, Butibori, Nagpur**, run by **Late Puranlal Agarwal CBSE School, Khasara No. 75/3, Village Turkamari, Tal. Hingna, Dist. Nagpur (Upper Primary to Higher Secondary by connecting it to Primary School, Class 6 to 12, All Branches, English Medium, CBSE)** on self-financed basis from the academic year 2023-24 under the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Rules, 2020. Now, approval for the said upgrade from the academic year 2023-24 is hereby granted, subject to the following terms and conditions:

**3. Terms and Conditions:**

1. The proposed school must comply with the provisions of the Right to Free and Compulsory Education of Children Act, 2009, and Maharashtra Right to Free and Compulsory Education of Children Rules, 2011.

2. The institution should adhere to the norms and conditions specified under the Maharashtra Self-financed School (Establishment and Regulation) Act, 2012, and follow the guidelines issued by the government from time to time.

3. The institution must strictly follow the rules of CBSE, CISCE, IB, IGCSE, or any other recognized board.

NOTARY
CHANDRASHEKHAR VISHWANATH SAKHARE
Nagpur
M.S. India
R.No. 29080
My Term Expires on 01-01-2030
GOVT. OF INDIA

Scanned with OKEN Scanner

4. The school should not collect any capitation fees or donations in violation of the Act, and fees should be charged as per government-approved norms.

5. School management should ensure the appointment of qualified teachers as per the prescribed norms.

6. For starting the school, the institution should obtain necessary clearances from the competent authority.

7. After receiving approval from the government, the institution should start the school within 18 months; otherwise, the permission letter will be deemed canceled.

8. The medium of instruction, fee structure, and future plans should comply with the government regulations.

9. If the management intends to start branches elsewhere, they should seek separate approval for each branch.

10. The institution should ensure teacher and staff recruitment as per prescribed standards for self-financed schools.

11. The school premises must prominently display a board mentioning it is a "Self-financed Permanent Non-grantable School."

12. If there is any violation of the rules and regulations mentioned in the Act or instructions issued by the government, the permission granted will be withdrawn or canceled.

**(Signature)**
**(Vivek Sapkal)**
**Officer on Special Duty, Government of Maharashtra**

**Copy to:**

1. Director of Education, Maharashtra State, Pune.
2. State Project Director, Maharashtra Prathamik Shikshan Parishad, Mumbai.
3. Director (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune.
4. Director (Primary), Maharashtra State, Pune.
5. Deputy Director of Education, Nagpur Division, Nagpur.
6. Education Officer (Primary/Secondary), Zilla Parishad, Nagpur.
7. File Number S.M.-2 (562/21)

NOTARY
CHANDRASHEKHAR VISHWANATH SAKHARE
Nagpur
M.S. India
R.No. 29880
My Term Expires on 01-01-2030
GOVT. OF INDIA

NOTARY
Chandrashekhar V. Sakhare
NAGPUR
(M.S.) India
Regn. No.
29880
My Term Expires on 01-01-2030
GOVT. OF INDIA

TRUE COPY
05/08/2025
CHANDRASHEKHAR VISHWANATH SAKHARE
ADVOCATE & NOTARY
NAGPUR. (M.S.)
REG. NO. 29880

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.५६२/एसएम-२ दिनांक:- २४ जुलै, २०२३

मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
हजरत बाबा लोधी-शाह बहूउद्देशिय शिक्षण संस्था,
बुटीबोरी, नागपूर.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...
हजरत बाबा लोधी-शाह बहूउद्देशिय शिक्षण संस्था, बुटीबोरी, नागपूर संचलित स्व. पुरनलाल अग्रवाल स्कुल, (सीबीएसई), खसारा क्र. ७५/३, मौजे तुरकमारी, ता. हिंगणा, जि. नागपूर.

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.५६२/एसएम-२, दिनांक ०३.०९.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत हजरत बाबा लोधी-शाह बहूउद्देशिय शिक्षण संस्था, बुटीबोरी, नागपूर या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून स्व. पुरनलाल अग्रवाल स्कुल, (सीबीएसई), खसारा क्र. ७५/३, मौजे तुरकमारी, ता. हिंगणा, जि. नागपूर या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून हजरत बाबा लोधी-शाह बहूउद्देशिय शिक्षण संस्था, बुटीबोरी, नागपूर संचलित स्व. पुरनलाल अग्रवाल स्कुल, (सीबीएसई), खसारा क्र. ७५/३, मौजे तुरकमारी, ता. हिंगणा, जि. नागपूर या (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासुन सदर दर्जावाढ करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

Scanned with OKEN Scanner

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत-१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर.
७. निवड नस्ती एस एम-२ (५६२/२१)

Scanned with OKEN Scanner